# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०१ १०१ दुरध्वनी क्र.२८१८११८२, २८१९२८२८.


## जाहिरात विभाग

जा.क्र.मनपा/जाहिरात/ ५२७ /२०२४-२५ — दि. ०८/०१/२०२५

प्रति,
**सिस्टीम मॅनेजर**
**संगणक विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

**विषय :- अनधिकृत जाहिराती तक्रारींबाबत जाहिर आवाहनास संकेतस्थळावर प्रसिध्दी देणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १५५/२०११ मध्ये अनधिकृत बॅनर्स/पोस्टर्स तसेच. होर्डिंग्ज वर कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विनापरवानगी जाहिराती / होर्डिंग्ज / बॅनर्स / पोस्टर्स इ. बाबतचे जाहिर आवाहन महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर त्वरीत प्रसिध्द करण्यांत यावे.

**सोबत :- जाहिर आवाहन प्रत.**

( स्वप्निल सावंत )
सहा.आयुक्त (जाहिरात)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

शुभम आर्केड, पहिला माळा, डी-मार्ट परिसर
M.I.R.A. हॉस्पिटलच्या पुढे, भाईंदर (प.) जि.ठाणे ४०११०१

## जाहिरात विभाग

जा.क्र.मनपा/जाहिरात/ ५२५ /२०२४-२५ दि. ०८ / ०७ /२०२५

## // जाहीर आवाहन //

मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १५५/२०११ मध्ये अनधिकृत बॅनर्स/पोस्टर्स तसेच होर्डिंग्ज वर कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तरी सर्व नागरिक / संस्था / मंडळे यांना सुचित करण्यात येते की, शहरामध्ये विनापरवानगी बॅनर्स / पोस्टर्स तसेच होर्डिंग्ज लावून व भिंती रंगवून जाहिराती करु नयेत, तसेच झाडावर कोणत्याही जाहिराती लावून इजा पोहचू नये, अन्यथा संबधितांवर सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायदयातंर्गत फौजदारी कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विनापरवानगी जाहिराती / होर्डिंग्ज / बॅनर्स / पोस्टर्स इ. आढळल्यास त्याची माहिती नागरिकांनी महापालिकेस देण्यासाठी खालीलप्रमाणे सहा.आयुक्त, (प्रभाग कार्यालय क्र.१ ते ६) सहा.आयुक्त (जाहिरात) व नोडल ऑफिसर यांचे भ्रमणध्वनी क्रमांक उपलब्ध करुन देण्यांत आले असुन रकाना क्र.६ मध्ये टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रभाग कार्यालयाचे नांव</th><th>सहा.आयुक्त यांचे नांव</th><th>भ्रमणध्वनी क्र.</th><th>नोडल ऑफिसर तथा उपआयुक्त</th><th>टोल फ्री क्रमांक</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td><td>६</td></tr>
<tr><td>१.</td><td>प्रभाग कार्यालय क्र.१</td><td>श्री. दिनेश कानगुडे</td><td>८४३३९११९७६</td><td rowspan="7">श्रीम. कल्पिता पिंपळे,<br>उपआयुक्त<br>(जाहिरात)<br>८६५५५१२६३९</td><td rowspan="7">१८००२२४८४९</td></tr>
<tr><td>२.</td><td>प्रभाग कार्यालय क्र.२</td><td>श्रीम. लॉरेटा घाडगे</td><td>९९८७०३११६४</td></tr>
<tr><td>३.</td><td>प्रभाग कार्यालय क्र.३</td><td>श्री. दत्तात्रय वरकुटे</td><td>९९६९५६५९५३</td></tr>
<tr><td>४.</td><td>प्रभाग कार्यालय क्र.४</td><td>श्री. सुधाकर लेंडवे</td><td>८२३७२७४५९५</td></tr>
<tr><td>५.</td><td>प्रभाग कार्यालय क्र.५</td><td>श्रीम. प्रियांका भोसले</td><td>७९७२५३९७१८</td></tr>
<tr><td>६.</td><td>प्रभाग कार्यालय क्र.६</td><td>श्रीम. कांचन गायकवाड</td><td>९४०४६९६५६०</td></tr>
<tr><td>७.</td><td>जाहिरात विभाग</td><td>श्री. स्वप्निल सावंत</td><td>८४२२८११४०१</td></tr>
</table>

सूज्ञ व जागरुक नागरिक यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, विनापरवानगी जाहिराती / होर्डिंग्ज/ बॅनर्स /पोस्टर्स आढळल्यास त्याची माहिती/छायाचित्रे देण्यासाठी महानगरपालिकेकडून कक्ष तयार करण्यांत आलेला असुन ८६५७०४७४०२ या सेल नंबरवर WhatsApp व SMS व्दारे माहिती /छायाचित्रे पाठविण्यात यावी. नागरीकांना सदरचे जाहिर आवाहन mbmc.gov.in या संकेतस्थळावर देखील पहाता येईल.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रहिवाशांना विनापरवानगी जाहिराती / होर्डिंग्ज / बॅनर्स/ पोस्टर्स वर नियंत्रण ठेवण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सहकार्य करणेबाबत जाहिर आवाहन करण्यांत येत आहे.

(कल्पिता पिंपळे)
उप आयुक्त (जाहिरात)
मिरा-भाईंदर महानगरपालिका